**ठळक बातम्या**

- गुन्ह्याच्या बाबतीत महाराष्ट्र देशात ८ व्या स्थानी, कायदा सुव्यवस्था राखण्यात अनेक आव्हानं असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत निवेदन
- विधानपरिषदेत उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावरचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानानं मंजूर
- जवाहरलाल नेहरु बंदरापासून चौकपर्यंतच्या ६ पदरी ग्रीन फील्ड महामार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता
- छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु करण्याची रेल्वे मंत्र्यांची लोकसभेत घोषणा

  **आणि**

- नागपूर हिंसाचाराप्रकरणी अटक केलेल्या ५१ जणांना येत्या २१ तारखेपर्यंत पोलीस कोठडी

**<><><><><>**

राज्यात कायदा सुव्यवस्था राखण्यात अनेक आव्हानं आहेत. पण त्यासाठी सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे असं निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केलं. अर्थसंकल्पातल्या गृह विभागाच्या अनुदानावरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. नागपूर हिंसाचार प्रकरणी पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना अजिबात क्षमा करणार नाही, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

गुन्ह्याच्या बाबतीत महाराष्ट्र देशात ८ व्या स्थानी आहे. विनयभंगाचा गुन्हा आता बलात्कार म्हणून नोंदवायला सुरुवात केली आहे. परिणामी महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांची नोंद होण्याचं प्रमाण १० वर्षात वाढलं आहे. यातले ९९ टक्क्यांहून अधिक बलात्कार हे ओळखीच्या व्यक्तीकडून होतात याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

गृह, जलसंपदा, पर्यावरण आणि वातावरणीय बदल, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, पाणी पुरवठा आणि स्वच्छता तसंच पर्यटन आणि सांस्कृतिक विभागाच्या अर्थसंकल्पातल्या मागण्या आज विधानसभेत मंजूर झाल्या.

<><><><><>

समाजमाध्यमांचा वाढता वापर लक्षात घेता १९७९ च्या सेवाशर्ती नियमांमध्ये बदल करून येत्या तीन महिन्यात नवं धोरण आणलं जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. शासकीय अधिकारी आणि कर्मचारी कोणताही विधिनिषेध न बाळगता समाज माध्यमांचा वापर करतात तसंच शासकीय धोरणांवर टीका करतात, असं सांगत भाजपाचे परिणय फुके यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. शासकीय कर्मचाऱ्यांनी समाजमाध्यमांवर सक्रिय असावं मात्र केवळ स्वतःचं उदात्तीकरण करण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर करू नये तर सामान्य लोकांच्या उपयोगासाठी वापर करावा असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><><>

उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावरचा विश्वासदर्शक ठराव आज विधानपरिषदेत आवाजी मतदानानं मंजूर झाला. यावर बोलू देण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. सभापतींनी ती फेटाळून लावली. विरोधी पक्षांनी आपली मागणी लावून धरल्यानं सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं. त्यामुळे सभापतींनी कामकाज पंधरा मिनिटांसाठी तहकूब केलं.

हा विश्वासदर्शक ठराव नियमबाह्य पद्धतीनं आणल्याचा आरोप विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केला. हा ठराव कोणत्या नियमानुसार मांडला याचा खुलासा करावा अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.

विश्वासदर्शक ठराव मांडला जाणार आहे याची माहिती विरोधी पक्षनेत्यांना नव्हती, पक्षांच्या गटनेत्यांच्या बैठकीत याची चर्चा का झाली नाही असा प्रश्न

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सदस्य अनिल परब यांनी विचारला. सभापतींनी यावर निर्णय द्यावा अशी मागणी विरोधी पक्षाने केली. ती तालिका सभापती चित्रा वाघ यांनी फेटाळल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. तसंच आजच्या दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. विरोधकांची ही भूमिका चुकीची असल्याची टीका मंत्री शंभूराज देसाई यांनी बातमीदारांशी बोलताना केली......

**होल्ड - बाईट -शंभूराज देसाई ( २७ सेकंद)**

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा नेमका किती आहे याची माहिती घेण्यासाठी तीन आमदारांची समिती नेमण्याचे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत दिले. पुढच्या पंधरा दिवसांत त्याचा अहवाल सादर करावा, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत नुकसान भरपाई देणार, असं कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज विधानसभेत एका लक्षवेधीला उत्तर देताना सांगितलं. राजेश विटेकरांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. या चर्चेत राहुल पाटील आणि सई डहाके यांनीही सहभाग घेतला. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस आणि पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई त्यांना तातडीनं देण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद १०० दिवसांच्या कृती आराखड्यात केली आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

नागपूरमधे हिंसाचारादरम्यान, महिला पोलीस कर्मचाऱ्याचा विनयभंग करण्याचा प्रयत्न जमावातल्या काही लोकांकडून झाला. या घटनेची तातडीनं

चौकशी करण्याचे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पोलीस महासंचालकांना दिले आहेत.

**<><><><>**

जवाहरलाल नेहरु बंदरापासून चौकपर्यंत ६ पदरी ग्रीन फील्ड महामार्ग बांधणी प्रकल्पाला आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली. या बैठकीनंतर, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या प्रकल्पावर साडेचारहजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पीएम गतीशक्ती राष्ट्रीय आराखड्याअंतर्गत हे काम होणार असून त्यामुळे एएनपीए आणि नवी मुंबईतला नवीन विमानतळ यांच्यातला संपर्क वेगवान होणार आहे.

भीम युपीआय मार्फत लहान मूल्याचे व्यवहार करण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या सुमारे दीडहजार कोटी रुपयांच्या योजनेलाही आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या योजनेनुसार लहान व्यापाऱ्यांना युपीआय सेवेसाठी अवांतर खर्च येणार नाही.

देशांतर्गत दूध उत्पादन वाढवण्यासाठी आणि पर्यायाने शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी राबवण्याच्या सुधारित गोकुळ अभियानाला आजच्या बैठकीत मान्यता मिळाली असून येत्या दोन वर्षात त्यासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद वाढवण्यात आली आहे.

**<><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित स्थळांना जोडणारी भारत गौरव रेल्वे लवकरच सुरु केली जाईल, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता.

नांदेड - पुणे रेल्वे गाडीला वंदे भारत मध्ये रुपांतरित करण्यासंदर्भात परभणीचे खासदार संजय जाधव यांनी प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना,

देशातल्या अनेक मोठ्या शहरातल्या रेल्वे स्थानकांची क्षमता वाढवण्याचं काम सुरु असल्याचं रेल्वेमंत्र्यांनी सांगितलं. पुणे आणि हडपसर इथल्या रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण करुन, त्यांची क्षमता वाढवण्याचं काम सुरु आहे, त्यानंतर या स्थानकांवरुन रेल्वे गाड्यांची संख्या वाढवली जाईल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नागपूर हिंसाचारात सहभागी असल्याच्या आरोपावरून अटक केलेल्या ५१ जणांना पोलिसांनी जिल्हा सत्र न्यायालयात हजर केलं असता न्यायालयानं सर्व आरोपींना येत्या २१ तारखेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे निर्देश दिले.

हिंसाचारात गंभीर जखमी झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. यात ३ पोलीस उपयुक्त, आणि ६ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे, असं पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांनी सांगितलं.

नागपूर शहरात ११ पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत आजही कलम १६३ अंतर्गत संचारबंदी लागू आहे, शहरातल्या १०० पेक्षा जास्त शाळा, महाविद्यालयं बंद ठेवण्यात आली आहेत.

**<><><><><>**

औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनानंतर सोमवारी नागपूर पोलिस ठाण्याबाहेर निदर्शनं केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीचे नेते फहीम खान यांना अटक केल्याचं वृत्तसंस्थेनं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

दंगल भडकवण्यात खान यांची काही भूमिका होती का, याचा तपास सुरू असल्याचं पोलीस आयुक्त सिंगल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नागपूर हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजी नगरचे जिल्हा दंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज खुल्ताबाद इथं औरंगजेबाच्या कबरीच्या आसपासच्या

परिसरात परिस्थितीची पाहणी केली, तसंच आढावा बैठक घेतली. पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड हेही बैठकीला उपस्थित होते. अलीकडेच उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर तिथं सुरक्षा बंदोबस्त वाढवला असून निगराणी कडक केली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन स्वामी यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

गेले नऊ महिने अंतराळ स्थानकात अडकून पडलेले अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर आज पहाटे स्पेसएक्स क्रू ड्रॅगन स्पेसक्राफ्टमधून पृथ्वीवर परतले. त्यांचं स्पेसएक्स कॅप्सूल पॅराशूटच्या मदतीनं मेक्सिकोच्या आखातात टालाहासीच्या किनाऱ्याजवळ उतरलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

विदर्भात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत काल किंचित वाढ झाली. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी रात्रीच्या तापमानात उल्लेखनीय वाढ झाली. मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी वाढ झाली.